**सामाजिक व शैक्षणिक मागासप्रवर्गातील उमेदवारांना आर्थिकदृष्टया दुर्बल घटक आरक्षण अथवा अराखीव (खुला प्रवर्ग) विकल्पाबाबतच्या ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र व नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - ०६ जुलै, २०२१

वाचा:- १. शासन निर्णय क्रमांक राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. १२ फेब्रुवारी, २०१९
२. शासन निर्णय क्र. राआधो/४०१९ प्र.क्र.३१/१६ अ, दि.२३ डिसेंबर, २०२०
३. शासन निर्णय क्र. राआधो/४०१९ प्र.क्र.३१/१६ अ, दि.३१ मे, २०२१

**प्रस्तावना :-**

राज्यात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी व शासन सेवेतील नियुक्त्यांमध्ये संदर्भ क्र. १ अन्वये १० टक्के आरक्षण विहित केलेले आहे. तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने एस.ई.बी.सी आरक्षणास दिलेली अंतरीम स्थगिती व तद्नंतर सदर आरक्षण अवैध ठरविले असल्याने संदर्भ क्र २ व ३ अन्वये एस.ई.बी.सी. उमेदवारांना ईडब्ल्यूएस प्रमाणपत्राच्या आधारे ईडब्ल्यूएस आरक्षणाचा लाभ अनुज्ञेय केला आहे. सदर लाभ हा दिनांक ०९.०९.२०२० रोजी प्रलंबित असलेल्या निवड प्रक्रिया व नियुक्त्यांसाठी पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात आला असून, जे उमेदवार आर्थिकदृष्टया दुर्बल घटक प्रमाणपत्र (EWS) सादर करतील त्यांना EWS आरक्षणाचा लाभ अथवा अराखीव असा विकल्प देण्यात आला आहे. यासंदर्भात EWS लाभाचे प्रमाणपत्र कोणत्या आर्थिक वर्षाचे सादर करावे ? अराखीव महिला उमेदवारांना नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (NCL) सादर करणे याबाबत उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून त्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक :**

सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) आरक्षणासंदर्भातील मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपिल नं. ३१२३/२०२० या प्रकरणी दिनांक ०५.०५.२०२१ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन, एसईबीसी उमेदवारांना ईडब्ल्यूएस अथवा अराखीव असा लाभ हा दिनांक ०९.०९.२०२० पासून अनुज्ञेय करण्यात आला आहे.

सदर बाब लक्षात घेता ज्या निवड प्रक्रिया प्रलंबित आहेत अथवा ज्या नियुक्त्या प्रलंबित असतील अशा प्रकरणामध्ये ईडब्ल्यूएस अथवा अराखीव (खुला) असा विकल्प देणाऱ्या एसईबीसी उमेदवारांसाठी पुढीलप्रमाणे लाभ अनुज्ञेय राहील :-

१) निवड प्रक्रियांमध्ये एसईबीसी उमेदवारांनी अर्ज केलेल्या ज्या जाहिरातीमध्ये ईडब्ल्यूएस आरक्षण लागू आहे, अशा निवडप्रक्रियांमध्ये एसईबीसी उमेदवारांना ईडब्ल्यूएस आरक्षण अनुज्ञेय करताना,

सन २०१८-१९ व सन २०१९-२० मधील परीक्षांसाठी मार्च २०२० व सन २०२०-२१ मधील परीक्षांसाठी मार्च २०२१ पर्यंत ग्राहय असणारे ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) ज्या एसईबीसी महिला उमेदवार अराखीव (खुला) असा विकल्प देतील अशा महिला उमेदवारांनी संबंधित पदाची / परीक्षेची जाहिरात (दोन किंवा अधिक टप्प्यांची परीक्षा असल्यास पूर्व परीक्षेची) प्रसिध्द झालेले आहे, त्या जाहिरातीनुसार एसईबीसी आरक्षणासाठी प्राप्त केलेले नॉन क्रिमिलेअर (NCL) प्रमाणपत्र हे अराखीव महिला पदासाठी ग्राहय धरण्यात यावे.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे (ईडब्ल्युएस) प्रमाणपत्र देण्याच्या कार्यवाहीस्तव संबंधित सक्षम प्राधिकारी सर्व विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी/सर्व निवासी उप जिल्हाधिकारी/सर्व तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांनी विशेष मोहिम राबवून उमेदवारांनी मागणी केल्यानुसार प्रमाणपत्र देण्यासाठी आवश्यक कार्यवाही विहीत मुदतीत तातडीने करावी.

सदर शासन परिपत्रक शासकीय/ निमशासकीय सेवा, मंडळे/महामंडळे, नगरपालिका / महानगरपालिका, जिल्हा परिषदा, शासकीय विद्यालय, महाविद्यालय, शासकीय शैक्षणिक संस्था, खाजगी विद्यालय, महाविद्यालय, शैक्षणिक संस्था, अनुदानित/विना अनुदानित विद्यालय, महाविद्यालय व शैक्षणिक संस्था आणि ज्यांना मार्गदर्शक आदेश देण्याचा अधिकार राज्य शासनाला आहे, अशी इतर सर्व प्राधिकरणे, सेवा व संस्था यांना लागू राहील. संबंधित यंत्रणांनी याबाबत आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२१०७०६१८००३३४८०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

TIKARAM WAMAN KARPATE

Digitally signed by TIKARAM WAMAN KARPATE
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, cn=TIKARAM WAMAN KARPATE
Date: 2021.07.06 18:07:50 +05'30'

**( टि. वा. करपते )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२. मा. सर्व सन्माननिय विधानसभा/ विधानपरिषद,व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य
३. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई.
४. मा. मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई.
६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,
९. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर,

१०.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११.प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१२.प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१३.प्रबंधक, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१४.प्रबंधक, मा. लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
१५.सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी/सर्व विभागीय जिल्हाधिकारी/उप विभागीय अधिकारी (प्रांत अधिकारी)/ सर्व तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार, महाराष्ट्र राज्य.
१६.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१७.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१८.सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय, मुंबई.
१९.मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२०.सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
२१.सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई.
२२.सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२३.सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२४.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२५.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२६.विधिमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई
२७.सर्व महामंडळे , मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२८.निवड नस्ती/कार्यासन १६-अ.